# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे खाली नमुद केलेल्या पदाच्या मुलाखती दिनांक ५ व ६ जून २०१७ या दिवशी आयोगाच्या कुपरेज टेलिफोन निगम इमारत, ८ वा मजला, महर्षि कर्वे मार्ग कुपरेज , मुंबई-४०००२१ येथील. कार्यालयात आयोजित करण्यात आल्या असून पात्र व अपात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थ्ळावर प्रसिध्द करण्यात आली आहे व उमेदवारांना sms द्वारे कळविण्यात आले आहे, तसेच मुलाखत पत्रे प्रोफाईलमध्ये उपलब्ध् करुन दिली आहेत. ज्या उमेदवारांना मुलाखत पत्रे प्राप्त होणार नाहीत अशा उमेदवारांनी ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग कुपरेज, मुंबई-४०००२१ येथील मुख्यं कार्यालयात संपर्क साधावा. याची संबधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| अ.क्रं | जाहिरात क्रंमाक | पदाचे नाव | मुलाखत दिनांक व वेळ. |
|---|---|---|---|
| १ | २८/२०१६ | अधिव्याख्याता, कलेचा इतिहास शासकीय कला संस्था महाराष्ट्रं कला शिक्षण सेवा गट-अ | दिनांक ५ जून २०१७ वेळ ९:४५ वा. सकाळी. |
| २ | २१/२०१६ | अधिव्याख्याता, कला व हस्तंव्यंवसाय वस्त्रकला विभाग, शासकीय संस्था महाराष्ट्रं कला शिक्षण सेवा गट-अ | दिनांक ६ जून २०१७ वेळ ९:४५वा. सकाळी. |

उपरोक्त पदाच्या मुलाखतीस पात्र ठरणा-या सर्व उमेदवारांनी मुलाखतीच्यावेळेस आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यंक आहे. मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्याकरीता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही व अशा उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही तसेच उमेदवारांने अर्जात केलेल्या दाव्यानुसार त्यांना मुलाखतीस बोलविण्यात आले आहे. उमेदवारांनी धारण केलेला अनुभव जाहिरातीतील तरतुदीप्रमाणे असणे आवश्यक आहे. याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

सं. पां. देशमुख
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.